हिंगोली
दिनांक :— २१.१०.२०२४

## प्रेस नोट

आरोपी लोकसेवक गजानन पुंजाजी पळसकर, शिक्षक वर्ग—३, सर्वोदय विदयालय,खुडज ता.सेनगाव जि.हिंगोली प्रतिनियुक्ती वरीष्ठ लिपीक, माध्यमिक शिक्षणाधिकारी, कार्यालय, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद हिंगोली यांनी यांनी १०,०००/— रू. लाचेची मागणी करून दि.२१.१०.२०२४ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान १०,०००/—रू. लाचेची रक्कम स्विकारल्याने त्याचे विरूध्द पोलीस स्टेशन हिंगोंली शहर जि.हिंगोली येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरू आहे.

---

पिडीत तक्रारदार यांनी दि.१४.१०.२०२४ रोजी तक्रार दिली की, आरोपी लोकसेवक गजानन पुंजाजी पळसकर, सहशिक्षक वर्ग ३, सर्वोदय विदयालय, खुडज ता.सेनगाव जि.हिंगोली प्रतिनियुक्ती वरीष्ठ लिपीक,माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालय, शिक्षण विभाग,जिल्हा परिषद हिंगोली हे तक्रारदार यांचे नावे असलेल्या अंनत टाईप रायटींग अॅन्ड शॉर्टहॅड इन्स्टिटयुट मध्ये संगणकाचे प्रशिक्षण देण्यासाठी नविन संगणक मान्यताचा प्रस्तावाची तपासणी करणे करीता शिक्षणाधिकारी माध्यमिक यांचे पत्र तयार करून फाईल सादर करण्यासाठी १०,०००/— रू. च्या लाचेची मागणी करत असल्याबाबत अॅ.क.ब्युरो हिंगोली कार्यालयात तक्रार दिली. त्यावरून दि.१४.१०.२०२४ रोजी लाच मागणी पडताळणी केली असता लोकसेवक पळसकर यांनी तक्रार यांचेकडे कामासाठी १०,०००/— रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले, त्यावरून दि.२१.१०.२०२४ रोजी तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करून सापळा कार्यवाही दरम्यान पंचासमक्ष लोकसेवक पळसकर यांनी १०,०००/— रू. लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले.

आरोपी लोकसेवक गजानन पुंजाजी पळसकर, शिक्षक वर्ग—३, सर्वोदय विदयालय,खुडज ता.सेनगाव जि. हिंगोली प्रतिनियुक्ती वरीष्ठ लिपीक,माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालय,शिक्षण विभाग,जिल्हा परिषद हिंगोली यांचे विरूध्द पोलीस स्टेशन हिंगोली शहर जि.हिंगोली येथे गुन्हा दाखल करण्याची पुढील कारवाई सुरू आहे.

ही कामगिरी श्री संदीप पालवे पोलीस अधीक्षक, मा.डॉ.संजय तुंगार अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड यांचे मार्गदर्शना खाली, श्री विकास घनवट, पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांनी श्री प्रफुल्ल अंकुशकर,पोलीस निरीक्षक,श्री. विनायक जाधव, पोलीस निरीक्षक,सपोउपनि विजय शुक्ला, पोहेकॉ तान्हाजी मुंढे, ज्ञानेश्वर पंचलींग, रविंद्र वरणे, गजानन पवार, भगवान मंडलीक, पोह गोविंद शिंदे, पोह राजाराम फुपाटे, शिवाजी वाघ, मपोह योगीता अवचार,चापोह श्री शेख मन्नान अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www. acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**मा.संदीप पालवे पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मो.नं. ९५४५५३१२३४**
**श्री. विकास घनवट, पोलीस उप अधीक्षक, मो.नं.९८२२२५९९३२**
**टोल फ्री क.—१०६४, दुरध्वनी क.०२४५६—२२३०५५**

(विकास घनवट)
पोलीस उप अधीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली